# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी पुणे

### बार्टी पुणे अंतर्गत संशोधन अधिछात्रवृत्तीधारकांच्या संशोधनकार्याचे सादरीकरण व विशेष मार्गदर्शनपर चर्चासत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जातीतील एम.फिल व पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने "डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती" राबविण्यात येत आहे. सदर अधिछात्रावृती योजना वर्ष 2013 पासून राबविण्यात येत असून आजपर्यंत एकूण 453 विद्यार्थी लाभ घेत आहेत. अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांस दरमहा रु. 25000 इतकी अधिछात्रवृत्ती रक्कम दिली जाते तसेच वार्षिक १० ते 12 हजार इतके आकस्मिक खर्च व वार्षिक 30 ते 90 हजार इतके घरभाडे भत्ता देण्यात येतो. यासोबतच प्रत्येक विद्यार्थ्यास उत्तम दर्जाचा लॅपटॉप दिला जातो.

बार्टीकडून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य दिले जात असल्याने संस्थेची ओळख केवळ फंडिंग एजन्सी इतकीच सीमित आहे. परंतु, शैक्षणिक क्षेत्रामध्ये सक्रीय असणाऱ्या संस्थाच्या विद्यापीठांच्या सहकार्याने विविध कार्यशाळा, चर्चासत्रे राबवून बार्टी संस्था शैक्षणिक क्षेत्रात देखील स्वतःची नवीन ओळख निर्माण करीत आहे.

अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी, तसेच यापुढील भविष्यात त्यांनी उत्कृष्ठ संशोधन कार्य करत त्यांच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवावे, या उद्देशाने दिनांक 10 एप्रिल, 2017 ते 12 एप्रिल, 2017 या कालावधीमध्ये यशदा, पुणे येथे तीन दिवसीय निवासी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतील तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले होते. चर्चासत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी संशोधन विषयामध्ये झालेल्या कामाचा आढावा व माहिती यांचे सादरीकरण करताना संशोधनामध्ये येणाऱ्या अडचणीसंदर्भात तज्ञ व्यक्तीसोबत चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या समस्यांचे तज्ञांनी केलेले विश्लेषण व त्यावरील मार्गदर्शन विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त ठरल्याचे विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिक्रियेमध्ये सांगितले.

कार्याशाळेदरम्यान मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारा विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून संशोधन विषय व झालेल्या कामाचा प्रगती जाणून घेतली. कॉन्फरसिंगच्या शेवटी विद्यार्थ्यांचे कौतुक करत यापुढे अशा पद्धतीने भविष्यात अनेक कार्यशाळा आयोजित करण्यासंदर्भात संशोधन विभागास सूचित केले. सामाजिक शास्त्र व शास्त्र विभागातून विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी सामाजिक न्याय व समता या विषयांस अनुसुप विषय तसेच समाजाच्या विकासास पूरक ठरणारे विषय संशोधनासाठी निवडले असल्याची बाब लक्षात घेऊन सदर कार्य समाजहितासाठी अत्यंत महत्वपूर्ण झाल्याचे सांगत श्री मा. राजेशजी ढाबरे, महासंचालक बार्टी यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

मा. सचिव सामाजिक न्याय विभाग यांची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सहा. प्राध्यापक डॉ. ज्योती शेट्टी, संशोधन अधिकारी आरती जाधव आणि श्रीशैल बिराजदार यांनी नियोजन केले असून शुभांगी सुतार व मंजूर तडवी यांनी सदर कार्यपुर्तीस सहाय्य केले आहे.




संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र



संशोधन विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहताना इतर सहभागी विद्यार्थी यांचे स्थिरचित्र




संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र



संशोधन विद्यार्थ्यांस तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करत असताना स्थिरचित्र




संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र




संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र



संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र



संशोधन विद्यार्थी सादरीकरण करत असताना स्थिरचित्र